नि.दि.दा.क्र.६२/२०२४
लक्ष्मीबाई / विनायक
वादीचा सा.क्र.०१
**नि.क्र.१२**

**<u>वादीतर्फे पुढील सरतपास विधीज्ञ श्री.एस.एच.तलमले यांचे मार्फत शपथेवर सुरुः</u>–**

०१. मी पुराव्याचा प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहण्यात आला आहे. सदर मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. मी दस्त यादी नि.क्र.१४ सोबत गाव नमुना ७/१२ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते. गाव नमुना ८–अ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते. नकाशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. प्रतिवादीला पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यावर माझे विधिज्ञ श्री. एस.एच.तलमले यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. पोस्टाची पावती दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते. पोस्टाचा अहवाल दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. तसेच दस्त यादी नि.क्र.१६ प्रमाणे फेरफार पत्रक दाखल केले आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते. जयवंताबाई बळीरामजी पाटील यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.ओ. के. मासुरके यांचे मार्फत</u>–**

प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर. अभिलेखावर कोणताही अर्ज सादर नाही. करीता उलटतपास नाही.

**उलटतपास संपला**

**सरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
स्वाक्षरी/-
(पी. के. मुटकुळे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुही, जि.नागपूर.

दि. १२.०३.२०२६.